# Current Global Reviewer

UGC Approved International Research Refereed Journal For All Subjects & All Languages

ISSN 2319-8648 | Impact Factor - 2.143 | Indexed (IIJIF) | UGC Approved Sr. No. 64310

SPECIAL ISSUE


**IQAC Sponsored**

One Day Interdisciplinary National Seminars

On


26 April, 2018 Issue: I Vol. I


# समकालीन मराठी साहित्य आणि संस्कृती


प्रमुख संपादक

प्राचार्य, डॉ. जी. एच. जाधव

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा, जि. उस्मानाबाद

संपादक

प्रा.डॉ. पद्माकर पिटले (जाजनूरकर)

मराठी विभाग प्रमुख

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा जि. उस्मानाबाद

Organised By

Dept. of Marathi

Shri Chhatrapati Shivaji College, Omerga Dist. Osmanabad



www.rjournals.co.in

CURRENT GLOBAL REVIEWER
Special Issue
Issue I Vol I, 26 April 2018
UGC Approved
Sr. No. 64310
ISSN : 2319 - 8648
Impact Factor : 2.143


| | | | |
|---|---|---|---|
| १७ | आदिवासी काव्याचे बदलते स्वरुप | प्रा. व्यवहारे एस. टी. | 85 |
| १८ | मराठी ग्रामीण कादंबरीतील बदलते खेडे : एक चिंतन | प्रा. डॉ. संग्राम टेकले | 89 |
| १९ | स्त्रीवादी साहित्य आणि समाज | डॉ. आशालता रामचंद्र गुट्टे | 93 |
| २० | स्त्रीवादी साहित्य आणि महिला सबलीकरण | प्रा. टाळकुटे विनायक तुकाराम | 96 |
| २१ | मराठी 'दलित साहित्य : विद्रोह, नकार आणि वेदना' | प्रा. हुसेन कदम | 98 |
| २२ | राष्ट्रसंत तुकडोजीचे स्त्री मुक्तीविषयक, स्त्री शिक्षणविषयक विचार | प्रा जगताप शिवाजी संभाजी | 100 |
| २३ | बदलते ग्रामवास्तव आणि आजची कादंबरी | प्रा. नंदकुमार माने | 111 |
| २४ | 1990 नंतरच्या ग्रामीण कादंबरीतील समाजदर्शन | प्रा. सुर्यवंशी दीपक सुभाषराव | 115 |
| २५ | "ग्रामीण साहित्यातील वास्तव आणि लेखकाची भूमिका" | डॉ. माने वैभव गोविंदराव | 118 |
| २६ | दलित रंगभूमी : एक दृष्टीक्षेप | प्रा.ज्योतीराम लोखंडे | 124 |
| २७ | आधुनिक मराठी साहित्यातील नवे वाङ्मयीन प्रवाह | डॉ. रामहरी मधुकर सुर्यवंशी | 129 |
| २८ | प्रखर स्त्रीवादी साहित्यीका नीरजा आणि महिला सबलीकरण | स.प्रा.शिंदे दुष्यंत आनंदराव | 134 |
| २९ | साहित्यातील मूल्य संकल्पना | प्रा. पसरकल्ले समाधान | 139 |
| ३० | स्त्रीवाद आणि स्त्रीवादी कविता | प्राचार्य डॉ.आशा मुंडे | 143 |
| ३१ | दलित आत्मकथनातील जाणिवा. | प्रा.डॉ. पद्माकर पिटले | 149 |
| ३२ | आदिवासी साहित्य : प्रेरणा आणि भूमिका | डॉ. शेटकार रामशेट्टी राजेंद्र | 153 |
| ३३ | समकालीन मराठी कादंबरी : काही निरीक्षणे | प्रा. डॉ. अत्तार अमजद हारूण | 159 |
| ३४ | जागतिकीकरणातील ग्रामीण कविता | प्रा.सुधीर गरड | 161 |

CURRENT GLOBAL REVIEWER
Special Issue
Issue I Vol I, 26 April 2018
UGC Approved Sr. No. 64310
ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 2.143

# 1990 नंतरच्या ग्रामीण कादंबरीतील समाजदर्शन

**प्रा. सुर्यवंशी दीपक सुभाषराव**
*(सहाय्यक प्राध्यापक) शिक्षण महर्षी ज्ञानेदव मोहेकर महाविद्यालय, कळंब जि. उस्मानाबाद*

--------- (24) ---------

**प्रस्तावना :**

साहित्यप्रक्रिया ही समाजातील एक चिंतनशील कलाकृती असते. साहित्यातून येणारे विश्व सामाजिक दस्ताऐवज असतो. साहित्य त्या-त्या काळाशी सुसंगत असते. तो समाजाचे प्रतिबिंब प्रकट करणारा जणू आरसा असे समीक्षकांनी या बाबतीत नोंदविले आहे. सामाजिक परिवर्तनाची नोंद वेळोवेळी होत असते, याची जाणीव 1990 नंतरच्या कथा, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र व समीक्षा इ. मधून प्रभावीपणे अभिव्यक्त झालेले दिसते. तरी परंतू इतर साहित्य प्रकारापेक्षा अधिक व्याप्ती असणारा साहित्यप्रकार म्हणजे कादंबरी यातून प्रकर्षाने त्याचे चित्रण झालेले आहे.

**1990 नंतरची ग्रामीण कादंबरी :**

समाजाची स्थिती गती बदलते मूल्य, प्रगती, सत्ता संघर्ष इ. अनेक बाबींची निरीक्षणे अत्यंत प्रभावी परिणामकारकरितीने रेखाटण्यात आलेले आहेत. मानवी जीवनचरित्राला कवेत सामावून घेणारा, संपूर्ण समाजदर्शन मांडणारा महत्वाचा प्रकार म्हणजेच कादंबरी होय. **1990** पर्यंतचे वास्तव **'झाडाझडती'** या विश्वास पाटील यांच्या कादंबरीत प्रभावीपणे घडविले आहे. समाजीवनाची ढवळून निघालेली परिस्थिती, धरणग्रस्त समाजाची स्थितीगती त्याची विदारक अवस्था या विषयाचे चिंतन शेतीसाठी पाणी मिळेल याकरिता धरणाची निर्मिती परंतू सर्वसामान्यांच्या अल्पभूमी असणाऱ्यांच्या जमिनी त्यात गेल्यानंतर आर्थिक उन्नती, प्रगती, जीवनातील स्थिरता, इ. सर्व कधी मिळणार? गरीबांचे जगणेच कठीण, त्यांचे सुखच हिरावून घेणारी परिस्थिती समोर आली. एकूण झाडाझडती या संवेदनशील कादंबरीतून विदारक सत्य, दाहक वास्तव यातून मांडले आहे. प्रस्तुत कांदवरीला साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला. त्या कलाकृतीची नोंद सर्वत्र दर्जेदार साहित्यकृती म्हणून करण्यात आली. विकासाच्या परिवर्तनाच्या नावाखाली गरीब, कष्टकरी, अल्पभुधारक शेतकऱ्यांची जीवन व्यथा कशी होते ते साकारले आहे. शेती हा अर्थव्यवस्थेचा कणा, शेतकरी अनंत कष्ट करणारा, जगाचा पोशिंदा असून तो सुमारे दिवसाला वीस हजार पावले चालतो, आयुष्यभर चालण्याचा जर आपण हिशोब मांडला तर तो आकडा पस्तीस ते चाळीस कोटी पावलांवर. आकडा मोठा वाटत असला तर विश्वास बसत नसला, तरी हा त्याच्या आयुष्याचा हिशेब मांडला तर आठ कोटी पावलांमध्ये एक पृथ्वी प्रदक्षिणा करतो. अजून तरी कोणत्याही बुकात त्याच्या या विक्रमाची नोंद घेण्यात आलेली नाही. चिंतनात्मकता याबाबतीत व्यक्त केली जाते.

मौज प्रकाशनाची अलिकडेच प्रकाशित झालेली **"गावठाण"** एक प्रभावी ग्रामीण कादंबरी असून ती कृष्णात खोत कोल्हापूर यांची आहे. प्रस्तुत कादंबरीत दलित आत्मकथनापलीकडील त्यातून हृदयद्रावक जीवन वर्णिले आहे. यातील नायिका आंदी आनंदी ग्रामीण काबाडकष्ट करणाऱ्या मुलींची ती प्रतिनिधीत्व करते. आयुष्यात राबराब राबताना होणारी परवड मांडली आहे. नायिका आंदी डोंगर वस्तीच्या गावात जन्मलेली लग्नापूर्वी ती आदिम पध्दतीने जीवन जगते, एक मुलगी असूनही पुरुषी सर्वच गुरे, ढोरे राखणे, कष्ट करणे, त्याच स्वतःला धन्य समजते. अशातच ती आनंद निरागसपणे शोधत राहते. आयुष्याच्या उत्तरार्धात मात्र ती दुःखद करुणास्पद जीवन जगते. समाजजीवनाचे निर्देशक असणारे त्यातील

Copyright © Shaurya Publication, Latur | www.rjorunals.co.in | Email-hitechresearch11@gmail.com

पात्र गुराढोरांची तांबवापासून राखण करणारी तांबूबाई, शेतीची राखण करणारा झुटिंगबा, डोंगराची राखण करणारी वागूबाई, गावाची राखण करणारी देवरशीण, ही सगळी जिवंत पात्र, बोलकी-संवाद साधणारी आहेत. भयंकर दारिद्र्य, आंदीचा बाप गावाला जाताना लंगोटीवर जातो. धोतर खांद्यावर घेतो पण पाहुण्याचे गाव जवळ आल्यावर धोतर नेसतो. वस्तू विनिमय पध्दतीही अतिशय मार्मिक तांदळाच्या बदल्यात रताळी, साळीच्या बदल्यात केळी अशी माहिती यात आली आहे. गुरे-ढोरे अधोगतीने सांभाळायला राखायला देण्यात येतात असे ग्राम वास्तव जीवनपध्दतीचे विवेचन यातून आलेले आहे. आंदीला सासरी माणसाकडून मात्र वेदना जाच होतो. अशी कारूण्यरसपूर्ण कहाणी यात चित्रित केली आहे. नायिका स्वच्छंदी निसर्गाशी समरुप असलेल्या खेड्यात जीवन जगावे असा विचार करते, शेवटी (कादंबरीच्या) त्या डोंगरी गावाच्या गावठाणास बापाच्या कुशीतच राहावेसे वाटते. पूर्वाधात तिला लग्न वगैरे भानगडी आवडत नसतात. परंतू गाय-गोऱ्यांची लागवण पाहते, तिच्या मैत्रीणीची सोयरीक होते तेव्हा पाखंराचे नातेसंबंधापेक्षा तीला पशू-पक्षांचे आदिम संबंध प्रामाणित वाटतात. अस हे जीवन असताना मात्र दुर्दैवाने तिच्याच वाट्याला नातेसंबंधातील भयानक स्थिती येते. आंदीच्या सुखी संसारात दुःखाचे वादळ येते. अचानक तिच्या नवऱ्याला भयानक रोग होतो व नंतर डॉक्टर हाच रोग तुझ्या मुलालाही असल्याचे निदान करतो. सगळे काही संपले आंदीला असे वाटते आणि तिच्या व्याकूळ मनोगताने कादंबरीकार कादंबरीच्या कथानकाला विराम देतो. प्रस्तुत कादंबरीची त्यातील कथावस्तूची तुलना करावयाची झाली तर रा. रं. बोराडे यांच्या **''पाचोळा''** 1971 मराठवाड्यातील समाजजीवन, बोलीभाषा संवाद याप्रमाणेच कांहीप्रमाणात समरुपता **''गावठाण''** कादंबरीशी असल्याचे दिसते.

याच कालखंडातील नागनाथ पाटील एक प्रयोगशील कादंबरीकार 1965 **''कोंडणातील जिणं''** यात विना अनुदानाच्या शापांन होरपाळणाऱ्या उच्च शिक्षणातील विविध घटकांचा विस्तृत आलेख यातही ग्रामीण भागातील तरुणांच्या भवितव्याविषयी चिंतन रेखाटले. अन्न, वस्त्र, निवारा आणि आरोग्य मुलभुत गरजा परंतु या गरजांमध्ये आज परिवर्तन होऊन विविध बाबींचा समावेश झाल्याचे दिसते. बदलती व लोकसंख्येचे अनेकविध प्रश्नांची उकल यातून केली. मराठवाड्यातील कसदार, दमदार, साहित्याची सेवा करणारे शेती-शेतकरी-शेतमजूर यांच्याविषयी माती व नाती यातील दुवा स्पष्टपणे अधोरेखीत करणारे शेषेराव मोहिते यांनी 1994 मध्ये असं जगणं तोलाच कादंबरीद्वारे ग्रामीण जीवनपध्दती आणि एकाच कादंबरीतून तीन पिढ्यांतर्गत सामाजिक संघर्ष याविषयी सखोल चिंतन केले. गावगाडा माणसा-माणसातील स्नेह, आपुलकी, स्वभावाचे विशेष, कष्ट, दुःख, दैन्य, दारिद्रय, समाजकल्याण, अर्थकारण व जागतिकीकरणाचा झालेला समग्र परिणाम यातून वास्तव जीवनाचे चिंतन विशद केले.

सदानंद देशमुख यांची **''तणकट, तहान''** या दोन अत्यंत महत्वपूर्ण कादंबऱ्या, खेडेगावातील अनेक समस्या दुष्काळ पाणी टंचाई यामुळे समाजजीवनाची चौकट, मूल्यहीन व्यवस्था सिमेंटच्या शहरीकरणाला मृगजळाला भूललेला तरुण याच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तनातून ग्रामीण व शहरी जीवनातील संघर्ष यात चित्रित केला आहे. सदानंद देशमुख यांनी नवशिक्षित तरुणांनी राजकारणात पदार्पण केल्यानंतर त्याचा दुष्परिणाम, आदर्शाचे होत जाणारे विडंबन, या प्रवाहात होणारा मूल्यांचा ऱ्हास, एकूणच या गाववाड्यात सत्तेतून-राजकारणातून निर्माण होणारा सत्तासंघर्ष याचे प्रत्ययकारी चित्रण याद्वारे केले आहे. धर्मांधता, जातीयता, स्वराज्य संस्थेच्या विकेंद्रकरणाच्या वेगातून आमूलाग्र होणारे परिवर्तन दाखविले आहे. विकासाची वाटचाल करणारी समाजव्यवस्था प्रसंगी मूलभ्रष्ट स्थितीकडे वाटचाल करताना दिसते.



Scanned with OKEN Scanner

याच ग्रामीण कादंबरीच्या प्रवाहातील सदानंद देशमुखांची **बारोमास** (साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त) कादंबरी परंपरागत शेती व्यवस्थेशी जोडलेली खेडे जाऊन आधुनिक रुपडे स्वीकारणार नागर व्यवस्थेशी जवळीक साधारण जीवन, सोई सुविधा, डांबरी रस्ते, सुविधा भौतिक साधनसामुग्री, स्वतंत्र्योत्तर काळातील समाजजीवन अंतर्बाह्य ढवळून निघालेले. उद्योग व्यवसाय नोकरशाही यांच्या तुलनेत शेतीला दुय्यम दर्जा मिळाल्याचे, खेडी हद्पार झाले. विवेचन यातून संघर्षसह जीवनपध्दती विशद केली आहे. याच अनुषंगाने ग्रामीण समाजव्यवस्थेचे वर्णन करणारे डॉ. जनार्दन वाघमारे यांनी आपल्या **''बखर एक खेड्याची''** अलिकडच्या काळातील (2005) गावगाड्यावर आधारलेले कादंबरी खेडेगाव कवठा हेच नायक रुपाने संवाद साधताना दिसते. ग्रामीजीवन, वास्तव प्रकर्षाने रेखाटतात.

भारत काळे यांनी **''ऐसे कुणबी भूपाळ''** कादंबरीत सामाजिक जाणीवा, विभक्त कुटुंबपध्दती, वाढती लोकसंख्या, मानवी नातेसंबंध, भाव-भावकीतील ताण तणाव व त्यातून निर्माण झालेले वैयक्तिक व सामुहिक पातळीवर संघर्षाचे, वृध्दांच्या समस्या, वडीलधारी मंडळीची होणारी परवड, यावरोबर 1960-1970 च्या दशकातील बदलते ग्रामजीवन, कुटुंबसंस्था, स्वार्थीवृत्ती, सत्तांधं वृत्ती, प्रचलित समाजमूल्यांवर होणारे आघात इ. समग्र बाबींचे विवेचन मार्मीकपणे या कादंबरीतून भारत काळे यांनी मराठवाड्याच्या पर्श्वभूमीवर अधोरेखित केले आहेत.

**सारांश :**

ग्रामीण समाजव्यवस्थेचे एकात्म रुप जाणून त्याठिकाणी विभक्त स्वरुपाची परिव्यवस्था निर्माण होत असल्याचे अनेक कथा कादंबरीकारांनी रेखाटले आहेत. यात मोहन पाटील - बस्तान, साखर फेरा, गणेश आवटे, भिरुड, बालाजी इंगळे - झिम पोरी झिम, शंकर सखाराम - सेझ, भीमराव वाघचौरे - अगार कुस, सुरेंद्र पाटील - चिखलवाटा, जगदीश कदम - गाडा, प्रशांत पोखरकर - गाव ढासाळत आहे, महेंद्र कदम - धुळपावलं, कैलाश दौंड - पाणधुई, कापूसकाळ, विजय जावळे - लेकमाता, तानाजी पाटील - जोहार, सुरेंद्र पाटील — झुलीच्या खाली. इ. कांही प्रमुख कादंबरीकारांनी जेस जीवन जगले तसेच्या तसे वास्तव अनुभव साहित्यकलाकृतीतून चित्रित केले. माती - नाती व एकूण गावाड्यातील विश्वाचा वेध यात घेतला आहे. रुपाने 1990 नंतरच्या समकालीन साहित्यात शोषणविरुध्दची समताधिष्ठीत मांडणी या ग्रामीण कादंबरीत प्रकर्षाने आलेली दिसते. स्वातंत्र्योत्तर समाजव्यवस्थेत आमूलग्र बदल - परिवर्तने झाली. व्यंकटेश माडगूळकर यांच्या काळातील परीस्थिती पूर्णपणे बदलून गेली. पारंपारिकतेची जागा ट्रॅक्टर, जीप, ट्रॅव्हल्स, ट्रक, रेल्वे, जेसीबी, इ. यंत्राची भर पडली, रस्ते, वीज नळयोजना स्वयंपुर्ण खेड्याची निर्मिती झाली आणि सामाजिक स्थितीगतीत सुधारणा झाली एकूणच जागतिकीकरण, आधुनिकीकरण, परिपाक म्हणजेच ग्रामीण साहित्यातील विश्व आहे.

**संदर्भ :**

1) डॉ. पाटील मोहन - ग्रामीण साहित्य आणि संस्कृती, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद.
2) डॉ. मुलाटे वासुदेव (संपादक) - ग्रामीण साहित्य चळवळ, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.
3) डॉ. मुलाटे वासुदेव - ग्रामीण साहित्य : चिंतन आणि चर्चा, स्वरुप प्रकाशन औरंगाबाद.
4) चंद्रकुमार नलगे - ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास, रिया पब्लिकेशन, शाहुपूरी कोल्हापूर.
5) डॉ. जाधव जयद्रथ (संपादक) -1980 नंतरचे मराठी साहित्य स्वरुप व समीक्षा.



Scanned with OKEN Scanner